# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## पिंपरी-४११०१८




## वैद्यकीय विभाग, मुख्य कार्यालय

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**

**स्थायी अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी**

# धन्वंतरी गोल्ड योजना धोरण – २०२५

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**अधिकारी / कर्मचा-यांसाठी धन्वंतरी गोल्ड योजना धोरण २०२५**
**वैद्यकीय विभाग**

१.

अ. सदर धोरणांस पिंपरी चिंचवड महानगरपालिका "धन्वंतरी गोल्ड योजना धोरण २०२५" असे संबोधण्यात येईल.

आ. सदरचे धोरण पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थायी आस्थापनेवरील व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांना लागू होईल.

इ. रजेवर असलेला किंवा निलंबित केलेला (Under Suspension) महानगरपालिका कर्मचारी आणि अधिकारी व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांना या योजनेचा लाभ मिळेल.

ई. सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी व त्याची/तिची पती / पत्नी दोघांनाच सदर योजनेचा लाभ मिळेल.

उ. बडतर्फ कर्मचा-यांना सदर योजनेचा लाभ मिळणार नाही.

ऊ. धन्वंतरी गोल्ड योजना लागु झालेनंतर पिंपरी-चिंचवड महानगरपालिका अधिकारी व कर्मचा-यांना या अनुषंगाने लागु असणारे यापूर्वीचे सर्व धोरण / ठराव / आदेश निरस्त होतील.

२. सदर योजनेकरिता कर्मचाऱ्यांच्या हिश्श्यापोटी त्यांच्या वेतन / सेवानिवृत्ती वेतनामधून महानगरपालिकेच्या धन्वंतरी गोल्ड योजनेच्या फंडामध्ये जमा झालेल्या निधीमधून खर्ची टाकण्यात येईल

३. सदर योजनेच्या नियमाप्रमाणे ज्यांनी सभासदत्व स्विकारलेले आहे असे सर्व स्थायी व सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी सदर योजना ऐच्छिक स्वरुपाची आहे. योजनेचे सभासदत्व मिळविण्यासाठी नमुना "अ" व नमुना "ब" मध्ये अर्ज करावा लागेल. आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी त्यास मान्यता दिल्यानंतर सभासदत्व प्रदान करण्यात येईल.

४.

**अ.** कुटुंबाची व्याख्या : महापालिका स्थायी आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचा-यावर (धन्वंतरी गोल्ड योजनेच्या सभासद यांचेवर) अवलंबून असलेले सभासदांचे आई, वडील, पती/पत्नी, औरस किंवा दत्तक घेतलेला पूर्णपणे अवलंबून असलेला अविवाहित मुलगा, मुलगी, (२५ वर्षापर्यंत), घटस्फोटीत किंवा विधवा मुलगी (कर्मचारी नोकरीमध्ये असेपर्यंत)

**आ.** सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचे संदर्भात फक्त पती आणि पत्नी व मुलांचे बाबतीत तो मतिमंद किंवा कायमस्वरुपी अपंगत्वामुळे यामध्ये वयाची अट धन्वंतरी समितीच्या मान्यतेने शिथिल करण्यात येईल.

**इ.** विधवा किंवा घटस्फोटीत मुलगी धन्वंतरी गोल्ड योजनेचे सभासद हयात असेपर्यंत धन्वंतरी गोल्ड योजनेचा लाभ घेणेस पात्र राहील. परंतु तिचा पुनर्विवाह झाल्यास तिला सदरचा लाभ मिळणार नाही.

(**टिप -** महिला कर्मचा-याला तिच्यावर पुर्णपणे अवलंबुन असलेल्या आणि तिच्याबरोबर राहत असलेला तिचा पती आणि सासु, सासरे किंवा आई, वडिल यांची निवड करता येईल व त्याबाबत प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक आहे.)

**ई.** अधिकारी / कर्मचाऱ्यांची पती किंवा पत्नी किंवा कुटूंबातील इतर व्यक्ती वैद्यकीय भत्ता देणा-या किंवा वैद्यकीय सेवा देणा-या राज्यशासन / केंद्र शासनाच्या/निमशासकीय सेवेत काम करीत असेल तर त्याला / तिला पिंपरी-चिंचवड धन्वंतरी गोल्ड योजना - २०२५ अन्वयेचा सवलतीचा लाभ घेता येणार नाही. यासंदर्भात संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांना र.रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे आणि खोटे प्रमाणपत्र दिलेले आढळल्यास त्यांचेविरुध्द कारवाई करण्यात येईल आणि प्रतिपूर्ती केलेली/अदा केलेली रक्कम त्यांचे वेतनातून किंवा त्यांचे फंडातून वसुल करण्यात येईल.

**उ.** ३१ मार्च २००२ अखेर महापालिका कर्मचाऱ्यांच्या कुटूंबातील २ पेक्षा जास्त हयात मुले असतील त्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना विनामुल्य वैद्यकीय उपचाराची सवलत मिळेल, परंतु ३१ मार्च २००२ नंतर ०२ पेक्षा जास्त अपत्य असणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यास फक्त पहिल्या दोन अपत्याकरीता सदर योजनेचा लाभ मिळेल. सदरचे नामनिर्देशन नंतर बदलता येणार नाहीत.

**ऊ.** कर्मचाऱ्यास प्रथम वेळी जुळी अपत्ये असल्यास, त्यानंतर झालेल्या अपत्यास सदरच्या योजनेचे लाभ अनुज्ञेय होणार नाही. तथापि, प्रथम वेळी एक अपत्य असल्यास व दुसऱ्या वेळी जुळी किंवा त्याहून अधिक अपत्ये झाल्यास, प्रथम अपत्य व दुसऱ्या वेळी झालेल्या अपत्यांना सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील.

**ऋ.** सदर योजनेचे सभासद होताना त्यांचेवर अवलंबुन असणाऱ्या कुटुंबातील व्यक्तींची नाव नोंदणी करणेत यावी. एखाद्याचा विवाह झालेनंतर तसेच अपत्य झालेनंतर तशी नोंद घेणेकरीता संबंधित विभागप्रमुखांमार्फत समितीकडे अर्ज सादर करणेत यावा.

**५.** या योजनेसाठी मनपा स्थायी आस्थापनेवरील व सेवानिवृत्त कर्मचारी व अधिकारी यांचेकडुन कर्मचारी हिस्सा म्हणून त्यांच्या संवार्गानुसार खालीलप्रमाणे दरमहा कपात करण्यात येईल

| संवर्ग | मनपा स्थायी आस्थापनेवरील व सेवानिवृत्त अधिकारी आणि कर्मचारी यांच्याकडील प्रति महिना सभासद वर्गणी |
|---|---|
| वर्ग-१ आणि वर्ग-२ | र.रु.१,५००/- |
| वर्ग-३ | र.रु.१,१००/- |
| वर्ग-४ | र.रु.७००/- |

**६.** सेवानिवृत्त कर्मचारी/अधिकाऱ्यांच्या बाबतीत कर्मचारी/ अधिकारी ज्या संवर्गातून सेवानिवृत्त झाले आहेत त्या संवर्गास लागू असणारी वर्गणी त्यांना लागू राहील. (उदा. एखादा अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्तीच्या दिवशी वर्ग एक व दोन या संवर्गात असल्यास त्याची मासिक वर्गणी रक्कम रुपये १५०० इतकी असेल तसेच वर्ग तीन करिता ११०० व वर्ग चार करिता ७०० प्रमाणे असेल).

७. प्रत्येक कर्मचा-यास धन्वंतरी गोल्ड योजना ओळखपत्र/फॅमिली ओळखपत्र देण्यात येईल. सदर ओळखपत्र / फॅमिली ओळखपत्र र.रू. १००/- रोख मनपा कोषागारात भरणा केल्यानंतर देण्यात येईल. मुळ ओळखपत्र गहाळ झालेनंतर दुबार ओळखपत्र र.रू. ५००/- रोख मनपा कोषागारात भरणा केल्यानंतर देण्यात येईल.

८. खाजगी रुग्णालयामध्ये सभासंदाना खालील प्रमाणे सुविधा देण्यात येतील -

**अ.** सर्व स्थायी व सेवानिवृत्त अधिकारी आणि कर्मचारी व त्यांचेवर अवलंबुन असणारे (कुटुंब व्याख्येनुसार) यांना सभासदाच्या संवर्गानुसार खालीलप्रमाणे रुग्णालयात सुविधा उपलब्ध असतील.

| संवर्ग | रुग्णालयातील उपलब्ध सुविधा |
|---|---|
| वर्ग-१ आणि वर्ग-२ | प्रायव्हेट रूम |
| वर्ग-३ | सेमी प्रायव्हेट रूम |
| वर्ग-४ | जनरल वार्ड |

या योजनेमध्ये भोजनाच्या खर्चाचा समावेश असणार नाही. सदरचा नियम ICU, ICCU मधील रुग्णांना लागु होणार नाही.

(टीप १ – एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्यास संवार्गानुसार उपलब्ध करून दिलेल्या (जनरल/प्रायव्हेट/सेमी प्रायव्हेट) रूममध्ये बदल करावयाचा असल्यास सभासद वर्गणी संबंधित संवर्गाप्रमाणे देय राहील. सदर कर्मचार्यांनी याबाबत सभासद नोंदणी करतानाच लेखी हमीपत्र धन्वंतरी विभागास सादर करावे. यामध्ये भविष्यात कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

टिप २ - धन्वंतरी स्वास्थ्य योजनेतंर्गत नियमानुसार दिलेल्या वैद्यकीय सेवेपेक्षा उच्च पातळीची सेवा हवी असल्यास आगाऊ होणा-या खर्चाची परिपुर्तता सभासदाने स्वत: करावयाची आहे.)

**आ.** दुर्धर आजाराने ग्रस्त व्यक्ती ज्यांना त्याकरिता आयुष्यभर उपचार घ्यावे लागतात (उदा. Oral Chemotherapy, Organ Transplant, Blood Related Diseases, Dialysis ई.) अशा व्यक्तींना मा. अधिष्ठाता, पदव्युत्तर संस्था, वायसीएम रुग्णालय यांच्या तज्ञ समितीमार्फत अभिप्राय घेऊन तदनंतर धन्वंतरी गोल्ड योजनेच्या कमिटीच्या मान्यतेने उपचाराच्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात यावी.

**इ.** सर्व सभासदांना समितीने मान्य केलेल्या ५०+१० रुग्णालयांत शस्त्रक्रिया व उपचार करुन घेता येईल. रुग्णालयांची वर्गवारी A, B आणि C नुसार तयार करण्यात आलेली असून त्यांची बिले सादर केल्यानंतर खालीलप्रमाणे अदा करण्यात येईल.

| रुग्णालयाचा वर्ग | मनपामार्फत रुग्णालयास अदा करावयाची रक्कम (बिले तपासणी केलेनंतर) | अधिकारी/कर्मचाऱ्याने बिलापोटी रुग्णालयातून डिस्चार्ज घेतेवेळेस भरावयाची रक्कम |
|---|---|---|
| A | ९०% | १०% |
| B | ९५% | ५% |
| C | १००% | ०% |

**ई.** ज्या रुग्णालयास अंगीकृत करून घेण्यात आलेले आहे व करारनामा करून घेण्यात आलेला आहे अशा रुग्णालयांचे नाव मनपा संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल व त्यास परिशिष्ठ "अ" असे संबोधण्यात यावे.

**उ.** रुग्णालयाने मनपास सादर केलेल्या बिलापैकी ७०% रक्कम मनपामार्फत सात ते दहा दिवसांमध्ये रुग्णालयास अदा करण्यात येईल.

**ऊ.** परिशिष्ट "क" मध्ये अंतर्भूत केलेली उपयंत्रे साधन सामुग्री आवश्यक ठरल्यास धन्वंतरी गोल्ड योजनेच्या निधीमधून अध्यक्षांच्या मान्यतेने त्याचा खर्च देणेत येईल.

**९.** निकडीच्या परिस्थितीमध्ये प्राधिकृत अशासकीय खाजगी रूग्णालयामध्ये औषधे पुरविणे आणि रूग्णालयात उपलब्ध नसलेल्या औषधांच्या रकमेची प्रतिपुर्ती करणे –

अ. सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी व ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी वैद्यकीय विभाग यांनी खाजगी अशासकीय रूग्णालयामध्ये दाखल केलेल्या महापालिका रूग्ण कर्मचारी किंवा धन्वंतरी गोल्ड योजना सभासद त्याचे रुग्ण नातेवाईकांवर खाजगी रूग्णालयामध्ये विहीत केलेली सर्व औषधे शक्यतोवर त्या रूग्णालयातुनच मनपाने निश्चित केलेल्या दराप्रमाणे मिळण्याची व्यवस्था करण्यात येईल.

आ. जेव्हा एखादे औषध, लस, रक्तजल किंवा उपचार विषयक पदार्थ अशा रूग्णालयात सर्वसाधारणपणे उपलब्ध नसतील तेंव्हा सदर प्राधिकृत रूग्णालयाकडुन ती उपलब्ध करून मिळतील अशी व्यवस्था मध्यवर्ती औषध भांडारातुन केली जाईल. जेंव्हा तसे शक्य नसलेस, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे लेखी आदेशानुसार खरेदी करून उपलब्ध करून देणेत येईल.

इ. स्वतः महापालिका कर्मचारी यांनी खरेदी केल्यास त्याच्या बिलाची प्रतिपुर्ती सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी व ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी वैद्यकीय विभाग यांचे प्रमाणपत्र आणि जरूर ती प्रमाणके सादर केल्यानंतर धन्वंतरी योजनेतंर्गत मंजुर करून प्रतिपुर्ती केली जाईल.

ई. एखाद्या सभासद / कर्मचाऱ्यांना साहित्य/उपकरणे/औषधे/लस/रक्तजल/इत्यादि खरेदी करणे शक्य नसल्यास अशा प्रसंगी सभासदांना ती कोठून खरेदी करणार त्याचे कोटेशन मागवून घ्यावे, व त्यावर अधिष्ठाता , वाय.सी.एम.रुग्णालय / आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी दराबाबत पडताळणी करुन योग्य ते धनादेश संबंधित पुरवठाधारकास दिले जातील.

उ. कोणत्याही परिस्थितीत सभासदांना रोख रक्कम दिली जाणार नाही.

ऊ. रुग्णालयामध्ये औषधोपचार घेत असताना रुग्णांस विविध यांत्रिक तपासण्या कराव्या लागतात त्यामध्ये CT Scan, MRI, सुविधा मनपा रूग्णालयामध्ये PPP तत्वावर सुरु असणाऱ्या सेंटर मध्ये मोफत उपलब्ध करून देण्यात येतील.

ऋ. X-ray, USG या सेवा मनपा रुग्णालयात करून घ्यावेत.

ऌ. PET Scan व शासनमान्य दुर्धर आजारांवरील रुग्णांकरिता OPD बेसिस वरील तपासण्या व औषधोपचारावरील खर्च तज्ञ समितीमार्फत तपासणी करून धन्वंतरी गोल्ड समितीच्या मान्यतेने धन्वंतरी गोल्ड योजना धोरणानुसार अदा करण्यात यावा.

ऍ. वंध्यत्व उपचार-

एकही अपत्य नसलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना एकच वेळेस IVF (In Vitro Fertilization) उपचाराकरिता, कमाल रक्कम रुपये एक लक्ष पर्यंत बिले सादर केल्यानंतर प्रतिपूर्ती करण्यात येईल.

**बाह्यरुग्ण विभाग स्तरावर औषधोपचार किंवा तपासण्या केल्यास त्याचा खर्च प्रस्तुतच्या योजनेमधून दिला जाणार नाही.**

१०. खाजगी रुग्णालयास सभासदांनी द्यावयाची कागदपत्रे -

अ. धन्वंतरी गोल्ड योजनेंतर्गत कर्मचा-यांचे ओळखपत्र/फॅमिली ओळखपत्र (Smart Card)

११. खाजगी रुग्णालयाने वैद्यकीय विभागाकडे (धन्वंतरी गोल्ड योजना कार्यालय) बिलासाठी मागणी करताना सादर करावयाची कागदपत्रे.

**अ.** सभासद दाखल झाल्यानंतर रुग्णालयाने सदर सभासद दाखल झालेबाबत मनपास कळविणे आवश्यक.

**आ.** सभासदांनी दिलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती.

**इ.** रुग्णालयाचे मूळ बिल.

**ई.** डिस्चार्ज कार्ड.

**उ.** बील मान्य असलेबाबत बिलावर सभासदाची स्वाक्षरी.

**ऊ.** बिल मागणी पत्र.

**१२. वैद्यकीय बिलाची मागणी –**

अ. या धोरणामध्ये अंगीकृत असणाऱ्या रुग्णालयाने अधिकारी व कर्मचारी किंवा त्यांचे अवलंबित यांना रुग्णालयातून सोडल्यानंतर दोन महिन्यामध्ये सर्व कागदपत्रांसह बिल धन्वंतरी विभागामध्ये सादर करावे. त्यानंतर सादर केलेल्या बिलाचा विचार केला जाणार नाही. याची जबाबदारी संबंधित प्राधिकृत रुग्णालयावर राहील.

आ. रुग्णालयाने मनपास सादर केलेल्या बिलापैकी ७०% रक्कम मनपामार्फत सात ते दहा दिवसांमध्ये रुग्णालयास अदा करण्यात येईल आणि उर्वरित बिल पूर्ण तपासणी करून धोरणानुसार दोन महिन्यांमध्ये (६० दिवस) अदा करण्यात येईल.

इ. अपवादात्मक परिस्थितीत तपासणीअंती अदा करावयाच्या बिलाची रक्कम ७०% पेक्षा कमी आल्यास रुग्णालयाच्या पुढील बिलातून सदर रक्कम वजा करण्यात येईल.

**१३. अंगीकृत नसलेल्या रुग्णालयांमध्ये दाखल झालेले रुग्णांबाबत -**

**अ. अंगीकृत नसलेल्या रुग्णालयांमध्ये दाखल झालेले रुग्णांबाबत**

१. धन्वंतरी गोल्ड धोरणानुसार प्रतिपुर्ती करण्यात येईल.

२. रुग्णाने रुग्णालयाचे बिल स्वतः अदा करून रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर एक महिन्यांच्या आत संबंधित विभागामध्ये सादर करावे व विभागाने धन्वंतरी विभागाकडे पुढील एक महिन्याच्या आत परिपूर्ण कागदपत्रांसहित सादर करावे.

३. परंतु अंगीकृत नसलेल्या रुग्णालयांमध्ये दाखल झाल्यानंतर कर्मचा-याने/कुटुंबीयांनी ५ दिवसांच्या आत ई-मेल/पत्राद्वारे शाखाप्रमुख/धन्वंतरी कक्षास कळवावे.

४. स्थायी आस्थापनेवरील व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी व त्यांचे अवलंबित पॅनलबाहेरील ५० पेक्षा कमी खाटा असलेल्या रुग्णालयात दाखल झाल्यास धन्वंतरी गोल्ड धोरणातील Category C मधील रुग्णालय दराप्रमाणे प्रतिपुर्ती करण्यात येईल.

**आ. तातडीचे उपचार –**

तातडीच्या व अपवादात्मक परिस्थितीच्या प्रसंगी धन्वंतरी गोल्ड योजना समिती मार्फत निर्णय घेण्यात येईल. तथापि उपचारासाठी रूग्णालयात ठेवण्यावर झालेला खर्च महापालिकेच्या धन्वंतरी गोल्ड योजनेच्या धोरणानुसार मान्य करण्यात आलेल्या दरानुसार अदा करण्यात येईल.

१४. निकडीच्या परिस्थितीमध्ये खाजगी रूग्णालयामध्ये आंतररूग्ण म्हणुन केलेले उपचार, विशेषज्ञांनी केलेले उपचारावर झालेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती होईल. तथापि उपचारासाठी रूग्णालयात ठेवण्यावर झालेला खर्च महापालिकेने मान्य केलेला दराप्रमाणेच देण्यात येतील.

१५. धन्वंतरी गोल्ड योजना समितीमार्फत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खाजगी रुग्णालयाशी करारनामे करावेत व या योजनेअंतर्गत अंगीकृत करण्यात आलेल्या रुग्णालयांमध्ये धन्वंतरी गोल्ड धोरणानुसार दाखल होणाऱ्या रुग्णांना कॅशलेस सेवा उपलब्ध करुन द्यावी.

१६. पिंपरी चिंचवड महानगरपालिका दवाखाना / रुग्णालयामधून अधिकारी व कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय तसेच सेवा निवृत्त कर्मचारी (पती / पत्नी) यांना मोफत उपचार सेवा सुविधा उपलब्ध राहतील.

१७. धन्वंतरी गोल्ड योजनेसाठी स्वतंत्र विभाग करणे आवश्यक आहे. अधिकारी / कर्मचारी स्वतंत्र नेमणुक करणे आवश्यक आहे. या विभागामार्फत वैद्यकीय बिलांची तांत्रिक तपासणी करणे व खाजगी रुग्णालयाला बीलाचे पेमेंट करणे (बिले करणे), मुख्य लेखापाल यांचेकडे पाठविणे, फॉर्म भरुन घेणे व ओळखपत्र देणे या कामकाजासाठी स्वतंत्र कर्मचारी वर्ग प्रशासन विभागाने उपलब्ध करुन द्यावा.

१८. सदर धन्वंतरी गोल्ड योजनेअंतर्गत नियमित कामकाज करण्याकरिता तसेच सर्व बिले अदागयी करण्याकरिता वैद्यकीय अधिकारी, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी यांची नेमणूक करण्यात येईल आणि अंतिम बिले अदायगी करण्याचे अधिकार सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी-आस्थापना यांना देण्यात येत आहेत. परंतु सदर योजनेमध्ये काही धोरणात्मक निर्णय घ्यावयाचे असल्यास नस्ती आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत मा.आयुक्त यांचेकडे सादर करण्यात येईल.

१९. परिशिष्ट "ड" चे यादी मधील नमुद आजारावरील खर्च मिळणार नाही.

२०. परिशिष्ट "ई" मधील यादीतील जादा खर्चीक आजाराच्या प्रति कुटुंब र.रु. २०,००,०००/- पेक्षा जास्त येणाऱ्या खर्चास धन्वंतरी गोल्ड योजना समितीची मान्यता घेणून निर्णय घेण्यात येईल.

२१. धन्वंतरी गोल्ड योजनेच्या धोरणाची अंमलबजावणी करण्याकरिता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आलेली आहे. प्रति कुटुंब र.रु. २०,००,०००/- पेक्षा जास्त वैद्यकीय बिल प्रतिपुर्ती व धन्वंतरी गोल्ड योजनेच्या धोरणांनुसार व आपत्कालीन परिस्थितीत सदर समितीमार्फत निर्णय घेण्यात येतील.

समितीचे सभासद खालीलप्रमाणे राहतील.

| | | |
|---|---|---|
| १. | आयुक्त | अध्यक्ष |
| २. | अध्यक्ष ,पिंचिंमनपा कर्मचारी महासंघ मान्यताप्राप्त | उपाध्यक्ष |
| ३. | अति. आयुक्त | उपाध्यक्ष |
| ४. | आरोग्य वैद्यकीय अधिकारी | कार्याध्यक्ष |
| ५. | मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी तथा संचालक (वित्त) | खजिनदार |
| ६. | सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी | सदस्य सचिव |

| | | |
|---|---|---|
| ७. | अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी | सदस्य |
| ८. | अधिष्ठाता | सदस्य |
| ९. | मुख्य लेखापरिक्षक | सदस्य |
| १०. | कायदा सल्लागार | सदस्य |
| ११. | उप/सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग | सदस्य |
| १२. | कामगार कल्याण अधिकारी | सदस्य |
| १३. | ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी (महिला) | सदस्य |
| १४. | मान्यताप्राप्त कर्मचारी महासंघाचे दोन प्रतिनिधी | सदस्य |

**२२.** समितीची बैठक प्रत्येक तीन महिन्यातुन एकदा भरविण्यात येईल. सभेची नोटिस कार्याध्यक्ष अध्यक्षांच्या मान्यतेने काढतील. त्याशिवाय अध्यक्ष यांना कोणत्याही वेळी समितीची बैठक बोलविण्याचे अधिकार राहतील.

**२३.** धन्वंतरी गोल्ड योजनेकरिता स्वतंत्र फंड निर्माण करुन सभासदांच्या वर्गणीची रक्कम कर्मचाऱ्याच्या दर महिन्याच्या वेतनातून परस्पर कपात करुन घेण्यात येईल. अशाप्रकारे सर्व सभासदांच्या वेतनातून कपात करण्यात आलेली रक्कम मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी तथा संचालक (वित्त) यांनी फंडाच्या निधीमध्ये जमा करावयाची आहे. त्याचप्रमाणे वार्षिक अंदाजपत्रक मान्य झाल्यानंतर धन्वंतरी गोल्ड योजना या लेखाशिर्षामध्ये मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी तथा संचालक (वित्त) यांनी निधी वर्ग करून द्यावा. निधीचा स्वतंत्र हिशोब लेखा विभागामार्फत ठेण्यात येईल.

**२४.** कर्मचा-यांच्या कुटूंबाच्या व्यक्तींच्या संख्येत बदल झाल्यास त्याची माहिती आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडे देण्याची कायदेशीर जबाबदारी कर्मचा-यावर राहील. कर्मचा-याने जाणीवपुर्वक कुटूंबाबाबत चुकीची माहिती दिल्यास समितीमार्फत कर्मचाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**२५.** समितीचे अधिकार -

**अ.** लाभार्थ्यांची पात्रता तपासणे.

**आ.** उपचारासाठी व शस्त्रक्रिया करण्यासाठी अंगीकृत करण्यात आलेल्या ५०+१० रुग्णालयांना व भविष्यात आवश्यकतेनुसार अतिरिक्त खाजगी रुग्णालये अंगीकृत करणे, त्यांचेसोबत करारनामा करण्यास मान्यता देणे, रुग्णालयांची योजनेतील मान्यता रद्द करणे इत्यादी अधिकार समितीस राहतील.

**इ.** परिशिष्ट ‘‘ब’’ मधील आजारांच्या यादीमध्ये बदल करणे.

**ई.** कार्याध्यक्ष तथा आरोग्य वैद्यकीय अधिकारी तसेच खजिनदार तथा मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी तथा संचालक (वित्त) यांनी सादर केलेल्या खर्चास मान्यता देणे.

**उ.** योजनेमध्ये फेरफार करण्याचे प्रस्ताव सादर करणे.

**ऊ.** एखाद्या कर्मचा-या संदर्भात निर्णय घेणे. (गुंतागुंतीचे प्रकरण)

**२६. अध्यक्ष यांचे अधिकार -**

**अ.** योजनेची अंमलबजावणी करण्याबाबतचे सर्व अधिकार अध्यक्षांना असतील.

**आ.** प्रशासकीय दृष्टिकोनातुन विशिष्ट प्रयोजनाकरिता त्यांना असलेले अधिकार मनपा सेवेतील कोणत्याही वर्ग-१ च्या अधिका-याकडे अंशतः वा संपुर्णतः सुपुर्त करणे.

**इ.** आणीबाणीच्या प्रसंगी कोणत्याही प्रकारची प्रकरणे समितीच्या शिफारशी शिवाय मान्य करणे.

**ई.** विशिष्ट कर्तव्यांसाठी वेळोवेळी प्राधिकृत अधिकारी नेमणे.

**उ.** आवश्यकतेनुसार सदर योजनेकरिता तरतुद उपलब्ध करून देणेकामी मा. मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी तथा संचालक (वित्त) यांना सूचना देणे.

**२७. कार्याध्यक्ष यांची कर्तव्ये व अधिकार -**

अ. कार्याध्यक्ष यांनी समितीची त्रैमासिक बैठकीची नोटिस व कार्यपत्रिका अध्यक्ष यांच्या मान्यतेने काढणे.

आ. समितीची बैठक ज्यावेळी घेणेत येईल त्या अगोदरच त्रैमासिक योजनेच्या अंमलबजावणीचा अहवाल समितीस सादर करणे.

इ. खर्चाचा अहवाल समितीपुढे सादर करणे.

ई. औषधोपचार व शस्त्रक्रिया याव्यतिरिक्त झालेल्या खर्चाचा तपशील समितीस सादर करणे.

उ. समितीच्या मान्यतेची आवश्यकता असलेल्या सर्व बाबी संदर्भात विषयपत्र सादर करणे.

ऊ. प्रतिपुर्ती रक्कम मंजुर करण्याचे सर्व अधिकार

२८. योजनेचे हिशोब ठेवण्याची पध्दती -

**अ.** मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी तथा संचालक (वित्त) हे योजनेच्या निधीमध्ये वर्ग झालेल्या सर्व जमा रकमांचे कर्मचारी संख्येप्रमाणे व मनपा निधीतुन येणा-या तरतुदीतील रकमांचे चोख हिशोब ठेवतील. सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची वैद्यकीय भत्त्याची रक्कम मुदतीत निधीमध्ये जमा होत आहे किंवा नाही? याची खात्री मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी तथा संचालक (वित्त) करतील.

**आ.** १ एप्रिलपासुन सुरू होणा-या व त्यापुढील प्रत्येक तिमाहीस योजनेवर वेगवेगळया बाबीवर झालेल्या खर्चाचा तपशील तयार करून अध्यक्ष यांच्या अवलोकनार्थ पाठविण्यात यावा.

**इ.** योजनेच्या निधीमधुन होणारा खर्च हा योजनेतील कर्मचा-यांवर होत आहे याची खात्री संबधित विभागाने वेळोवेळी करावी.

२९. वैद्यकीय बिलाच्या प्रतिपुर्ती बाबतचे अधिकार आरोग्य वैद्यकीय अधिकारी तथा कार्याध्यक्ष यांचेकडे राहतील. तसेच कर्मचारी / अधिकारी यांना प्रतिपुर्तीची मंजुर रक्कम अदा करावयाचे धनादेशावर मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी तथा संचालक (वित्त) (खजिनदार) व आरोग्य वैद्यकीय अधिकारी (कार्याध्यक्ष) यांची स्वाक्षरी राहील.

**सही/-**
**आरोग्य वैद्यकीय अधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

**सही/-**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
धन्वंतरी गोल्ड योजना
**प्रतिज्ञापत्र (नमुना अ)**

कर्मचारी संगणक क्रमांक : ..........................................................................................
सभासदाचे संपुर्ण नाव : श्री/श्रीम......................................................................................
पदनाम : ..........................................................................................
विभागाचे नाव : ..........................................................................................
निवासाचा संपुर्ण पत्ता : ..........................................................................................
..........................................................................................
मोबाईल क्रमांक : ..........................................................................................
जन्म दिनांक : ..........................................................................................
वडिलांचे / पतीचे नाव : ..........................................................................................
सभासदाचे वय वर्ष : ..........................................................................................
नियमित वेतन श्रेणीतील रुजू दिनांक : ..........................................................................................

**सभासदावर अवलंबुन असलेल्या कुटुंबातील व्यक्तींची नावे (प्रतिज्ञापत्र देणाऱ्याचे नाव वगळून)**

| अ.क्र. | सभासदाच्या कुटुंबातील नावे | जन्मदिनांक | वय | सभासदांशी नाते | पुरावा |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |

मी सत्यप्रतिज्ञेवर जाहिर करतो/करते की, वर दिलेली माहिती सत्य व बरोबर आहे. त्यामध्ये जे बदल होतील ते मी अशा बदलाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत धन्वंतरी कक्ष, वैद्यकीय विभाग यांचेकडे शाखाप्रमुखाच्या शिफारशीने लेखी कळवीन व त्याची संपुर्ण जबाबदारी माझ्यावर राहील. मी या योजनेचा सभासद होण्यास इच्छुक आहे. सदर योजनेअंतर्गत माझे दरमहाचे मासिक वेतनातून र.रु. .................... प्रमाणे कपात करून देण्यास या प्रतिज्ञापत्राद्वारे संमती देत आहे. धन्वंतरी योजनेचा लाभ वरीलप्रमाणे माझ्यावर पुर्णपणे अवलंबून असणाऱ्या सभासदांकरीताच करेन. तसे न आढळल्यास कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन याची मला जाणीव आहे.

सभासदाची सही
______________________

खातेप्रमुख / कार्यालयप्रमुख यांची शिफारस

१. सेवकाचे नाव : श्री./श्रीम. ..................................................................

२. मनपा सेवेतील वेतनश्रेणीतील नेमणुक दिनांक. : ...........................................................................

३. वेतन बिल क्रमांक : ...........................................................................

४. सेवा निवृत्ती दिनांक : ...........................................................................

खातेप्रमुख / कार्यालयप्रमुख सही व शिक्का

---

श्री./श्रीमती ........................................................... यांना धन्वंतरी गोल्ड योजनेचे सभासदत्व देण्यात आलेले असून त्यांचा सभासद क्र. .............................. असा आहे. त्यांच्या दरमहाच्या वेतनातून र.रु. ........... प्रमाणे धन्वंतरी स्वास्थ्य योजनेचा निधी कपात करण्यात यावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

**सोबत खालीलप्रमाणे कागदपत्र पुराव्या दाखल जोडणे आवश्यक आहे –**

१. प्रत्येक सभासदाचा पासपोर्ट आकाराचा एक फोटो
२. सभासदावर पुर्णपणे अवलंबुन असणाऱ्या अपंग / मतीमंद पाल्याच्या बाबतीत जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडील अलीकडील प्रणापत्राची झेरॉक्स सत्यप्रत.
३. रेशनींग कार्डची झेरॉक्स सत्यप्रत.
४. मुलगी विधवा असल्यास तिचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र व पतीचा मृत्युचा दाखला झेरॉक्स सत्यप्रत.
५. मुलगी घटस्फोटीत असल्यास तिचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र व पतीचा न्यायालयाकडील घटस्फोटाचे निर्णयाची झेरॉक्स सत्यप्रत.
६. महिला कर्मचाऱ्यांच्या बाबतील आई, वडील अथवा सासु, सासरे या दोन्हींपैकी फक्त एकाची सभासदत्वासाठी नावे नोंदणी करु शकतात. विवाहीत महिला कर्मचाऱ्यांना त्यांच्या आई वडीलांची नावे समाविष्ट करावयाची असल्यास नोटराईज प्रतिज्ञापत्र (प्रतिज्ञापत्रावर आई वडीलांचे नजीकचे काळातील फोटो प्रमाणित करणे आवश्यक राहील.)
७. पाल्य सभासदाचे जन्म तारखेचे दाखले जोडावेत (जन्म दाखला, शाळा सोडण्याचा दाखला, SSC उत्तीर्ण बोर्ड प्रमाणपत्र, आधार कार्ड झेरॉक्स सत्यप्रत)
८. दत्तक मुलगा/मुलगी असल्यास मे.न्यायालयीन आदेशाची झेरॉक्स सत्यप्रत.
९. ३१ मार्च २००२ नंतर ०२ पेक्षा अधिक अपत्य असल्यास असे अपत्य सभासद होणेस अपात्र राहतील.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

धन्वंतरी स्वास्थ्य योजना

**प्रतिज्ञापत्र (नमुना ब)**

PPO No- : ..........................................................................................................

सभासदाचे संपुर्ण नाव : ..........................................................................................................

पदनाम : ..........................................................................................................

विभागाचे नाव : लेखा विभाग

निवासाचा संपुर्ण पत्ता : ..........................................................................................................

: ..........................................................................................................

कायमचा पत्ता : ..........................................................................................................

: ..........................................................................................................

मोबाईल क्रमांक : ..........................................................................................................

वडिलांचे / पतीचे नाव : ..........................................................................................................

सेवानिवृत्त दिनांक : ..........................................................................................................

**सभासदावर अवलंबुन असलेल्या कुटुंबातील व्यक्तीचे नावे (प्रतिज्ञापत्र देणा-याचे नाव वगळुन)**

| **अ.क्र** | **सभासदाचे कुंटुंबातील नावे** | **जन्मदिनांक** | **वय** | **सभासदाशी नाते** | **पुरावा** |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |

मी सत्य प्रतिज्ञेवर जाहिर करतो/करते की, वर दिलेली माहिती सत्य व बरोबर आहे.यामध्ये जे बदल होतील ते मी अशा बदलाच्या दिनांकापासुन १५ दिवसांच्या आत कार्यालयास लेखी कळविन व त्याची संपुर्ण जबाबदारी माझ्यावर

राहिल. मी या योजनेचा सभासद होण्यास इच्छुक आहे. सदर योजनेअंतर्गत मी माझे दरमहाचे सेवानिवृत्ती वेतनातुन र रु ………................/ प्रमाणे कपात करुन देणेस या प्रतिज्ञापत्राद्ववारे संमती देत आहे. धन्वंतरी योजनेचा लाभ माझ्या पती / पत्नी व आर्थिक दृष्ट्या माझ्यावर पुर्णपणे अवलंबुन असणा-या व वरील प्रमाणे नमुद केलेल्या सभासदांकरिताच करेन, असे न आढळल्यास कायदेशीर कारवाईस मी पात्र राहिन याची मला जाणिव आहे.

**सभासदाची सही**

---

**मुख्यलेखापाल कार्यालय**

| | |
|---|---|
| १. सेवानिवृत्त कर्मचा-याचे नाव | : ............................................................................................................... |
| २. सेवानिवृत्त दिनांक | : ............................................................................................................... |
| ३. पती/पत्नी हयात आहेत अगर कसे ? | : ............................................................................................................... |

**खातेप्रमुख / कार्यालयप्रमुख सही व शिक्का**

---

श्री/श्रीमती ……………………………………………………. सेवानिवृत्त सेवक/ सेविका यांना धन्वंतरी स्वास्थ्य योजनेचे सभासदत्व देण्यात आलेले असुन त्यांचा सभासद क्रमांक ................... असा आहे. त्यांच्या मासिक सेवानिवृती वेतनातुन दरमहा र रु ................/- प्रमाणे रक्कम कपात करण्यात यावी

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी**
पिंपरी चिचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

**सोबत खालील प्रमाणे कागदपत्र पुराव्या दाखल जोडणे आवश्यक आहे-**

१. प्रत्येक सभासदाचा पासपोर्ट आकाराचा एक फोटो.
२. सभासदावर पुर्णपणे अवलंबुन असणा-या अपंग/मतीमंद पाल्याच्या बाबतीत जिल्हा शल्यचिकीत्सक रुग्णालयाचे अलीकडील प्रमाणपत्राची झेरॉक्स सत्यप्रत.
३. रेशनींग कार्डची झेरॉक्स सत्यप्रत.

## परिशिष्ट “अ”

**रुग्णालय तक्ता**

| "A" | "B" | "C" |
|---|---|---|
| Above 200 beds | 100-199 beds | 50 to 99 Beds |

**परिशिष्ट “ब”**

शासननिर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रं.एमएजी 2005/9/प्र.क्र.9/आ.3, दि. 19 मार्च 2005 चे सहपत्र

१. ओरल किमोथेरपी

२. अवयव प्रत्यारोपण

३. हिमोफीलीया आजार (रक्ताचे आजार)

४. Cochlear Implant

५. स्पेसिफिक केस नुसार गरज भासल्यास सदर यादीमध्ये बदल करण्याचे अधिकार धन्वंतरी गोल्ड योजना समितीस असतील.

## परिशिष्ट “क”

**'List of Medicines"**

1. Antibiotics, Capsules, Tablets, Dusting powders, Ointment Etc.
2. Sedatives, Analgesics, Tranquillisers and Hypnotics and antipyretic drugs.
3. Chemotherapeutic drugs.
4. Parasympatholytic and parasympathemimedio drugs.
5. Sympatholytic and Sympathominericordrugs.
6. General cerebral stimulant drugs.
7. Vasodilator drugs.
8. Local Anaesthetics
9. Antigungal and antiparastitic drugs, ointments and dusting powders.
10. Antihistaminic drugs.
11. Vitamin Preparations.
12. Hormonal Preparations.
13. Antitioxins, Vaccines and sera.
14. Any purgative, carminative antiemetic or emetic drugs and antidiarrheal drugs, Cholagogues.
15. Anticoagulants.
16. Anticarcinomatous drugs.
17. Cardiao Glycosides and Antiarythmic Agents.
18. Antihypertensive Agents.
19. Diuretics
20. Oxytocis
21. Antidiabeties and drugs for other metabolic disorder.
22. Protein Suppliments and Antianaemics.
23. Infusions and Transfusions.

**Name of the Artifical Appliances:-**

1. Unilateral long leg brance without hip joint.
2. Hip joint with pelvic band
3. Spinal Brace
4. Unilateral short leg brace
5. Shoe or Boot-Protective or aiding to paralysed or weak leg

6. Bilateral hip joint with pelvic band/Weak leg
7. Bilateral long leg brace without hip joint.
8. Bilateral short leg brace
9. Lumbe-sacral or spinal support or Back support
10. Taylor's Brace
11. Milwaukee brace
12. Mermaid splint
13. Posterior slab
14. Cervical Brace four post
15. Bigid Cervical coller with head extension
16. Cervical Collar
17. Dynamic splint (Aluminium)
18. Cock-up Splint (Plain-aluminium)
19. Cock-up Splint (plastic) or long oppoens
20. Turn Buckle Splint
21. Nuckle bender splint
22. Anterior knee Guard Splint
23. Denis Brown Splint
24. Congenital Talipus Equino Varus/Valgus Splint
25. Short opponens P.V.C. (plastic)
26. Knee Cage
27. Long opponens with M.P.F.I. bar and finger
28. Extension (plastic) Dynamic
29. Boot with C & E heel and arch support
30. C & E Heel
31. Arch Support
32. M.T. Pad
33. M.T.E. Raising
34. T.Strap
35. Sponge heel
36. Wedge 1/8
37. Universal raising 1"
38. Foot drop splint
39. Below knee prosthetics (P.T.B. type prosthetics)
40. A.K. prosthetics

41. Aluminimum adjustable above knee right splint
42. Plastic shoulder abduction splint
43. Plaster of paris or Gypsona cst
44. Modified shoes
45. Below Elbow Prosthesis
46. Hooks
47. Cosmetic Hand
48. Splint for C.D.H.
49. Splint for Elbow
50. Above Elbow and below Elbow Prosthetics
51. Corrset
52. Wheel Chair
53. Protective shoes with microcellular rubber without nails often with additional gadgets like adjustable springs and rockers.
54. Crutches
55. Walking iron with plaster casts
56. Calipers
57. Braces
58. Artifical-limbs
59. Heart pace maker
60. Pulse Generator
61. Haemo Dyalisis
62. Inhaler
63. I.V. Sets
64. Scalp Veins needle
65. Extra cap cathetor
66. Disposable syrine & needle 10 & 2 C.C.
67. All type of infusion to transfusion.
68. Guard wire (T.Shape)

## परिशिष्ट “ड”

**अनुज्ञेय नसलेल्या आजाराची यादी :-**

1. चष्मा/कॉन्टॅक्टलेन्स / श्रवणयंत्र खरेदी
2. दंतोपचार / Orthodontic treatment,
3. अशक्तपणा, जनरल विकनेस, आजारातुन बरा झालेनंतरचा उपचार, गुप्तरोग
4. स्वत:चे स्वत: जखम केलेले
5. मद्यसेवनामुळे उदभवणारे आजार/आत्मदहनाचा प्रयत्न
6. विटॅमिन्स टॉनिक,
7. निसर्ग उपचार (चुंबकीय चिकित्सा, ऍक्युपंक्चर, योगासने) जलधारा/जलनीती उपचार इ.
8. लैंगिक समस्या
9. बुध्दीमत्ता चाचणी/आहार
10. आहार तज्ञाकडुन घेतलेली ट्रिटमेंट
11. केस/केसरोपन (टक्कलवर केलेले उपचार)
12. मसाज ट्रिटमेंट
13. ब्युटी ट्रिटमेंट साठी केलेली सर्जरी
14. स्थुलपनावर घेतलेली ट्रिटमेंट
15. रुग्णाचे आजारासाठी विसंगत उपचार व तपासणीचा खर्च

## परिशिष्ट "इ"

**जादा खर्चिक आजार (र.रु. २०,००,०००/- पेक्षा जास्त)**

१. कॅन्सर (कर्करोग)

२. हृदयविकार (Heart disease)

३. किडनी आजार

४. जन्मजात मोठे आजार (विकृती)

५. मोठे अपघात

६. हिमोफीलीया आजार (रक्ताचे आजार)

७. इतर मोठे जीवघेणे आजार

८. Orthopedic Replacement

९. Prothesis

१०. Cochlear Implant

११. Liver / Organ Transplant